**ठळक बातम्या**

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आठ खासदार फुटून शिवसेनेत येणार असल्याचं वृत्त एकनाथ शिंदे यांनी फेटाळलं

- वादग्रस्त न्यायमूर्ती  यशवंत वर्मा यांचा पदाचा राजीनामा

- विधानसभा निवडणुकीसाठी आसाममधे सुमारे ८६, तर पुदुचेरीमधे सुमारे ९०  टक्के अशी विक्रमी मतदानाची नोंद

- मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर विभागाच्या कारवाईत सुमारे ३० किलो सोनं जप्त

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ९१८ अंकांची वाढ

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ८ खासदार फुटून शिवसेनेत येणार असल्याचं वृत्त शिवसेनेनं फेटाळलं आहे. ठाकरे गटाच्या खासदारांसोबत झालेल्या कथित बैठकीचं वृत्त पूर्णपणे निराधार, खोडसाळ आणि गैरसमज निर्माण करणारं असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बोलत होते. अशी कोणतीही बैठक झालेली नाही, त्यामुळे माध्यमांनी अशा बातम्या देणं टाळलं पाहिजे असंही शिंदे यांनी सांगितलं.

<><><><><>

वादग्रस्त न्यायमूर्ती  यशवंत वर्मा यांनी आज पदाचा राजीनामा दिला. अलाहाबाद न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून काम करत असताना वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात जळालेल्या नोटा आढळल्याप्रकरणी त्यांच्यावर महाभियोग चालवण्यात येत होता. राजीनाम्यासाठी वेगळं कारण न देता, आपण अतिशय शोकसंतापाने पदाचा राजीनामा देत असल्याचं त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना उद्देशून लिहीलेल्या राजीनामापत्रात म्हटलं आहे.

<><><><><>

पुदुचेरी, आसाम आणि केरळमधे  विधानसभा निवडणुकांसाठी काल झालेल्या मतदानाची अधिकृत आकडेवारी निवडणूक आयोगाने जाहीर केली आहे. त्यानुसार आसाममधे ८५ पूर्णांक ९१ शतांश टक्के तर पुदुचेरीमधे ८९ पूर्णांक ८७ शतांश टक्के अशी विक्रमी मतदानाची नोंद झाली आहे. केरळात ७८ पूर्णांक २७ शतांश टक्के मतदारांनी मतदान केलं. या तिन्ही ठिकाणी महिलांनी केलेल्या मतदानाची टक्केवारी देखील विक्रमी आहे. आसाममधे साडे८६  टक्के, केरळात ८१ पूर्णांक १९ शतांश टक्के तर पुदुचेरीत ९१ पूर्णांक ४ दशांश टक्के महिला मतदारांनी आपली पसंती मतयंत्रावर नोंदवली.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षादरम्यान वीज आणि ऊर्जेची मागणी टिपेला पोहोचली असतानाही काळातही यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली, असं केंद्र सरकारने म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित आंतरमंत्रालयीन बैठकीत ऊर्जा मंत्रालयाचे सचिव पियुष सिंग यांनी सांगितलं, की देशातल्या सर्व औष्णिक वीज प्रकल्पांमधे कोळशाचा पुरेसा  साठा असून ते पूर्ण क्षमतेनं काम करत आहेत. येत्या ३ महिन्यात औष्णिक, सौर, पवन आणि जलविद्युत प्रकल्पांची एकत्रित क्षमता  २२ हजार मेगा वॅट्स पर्यंत नेण्याची सरकारची योजना आहे.

देशात घरगुती वापराचा एलपीजी आणि इंधनाचा पुरवठा स्थिर असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी सांगितलं. पेट्रोल, आणि डिझेल पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून कुठेही साठा संपल्याचं वृत्त नाही असं त्या म्हणाल्या. गेल्या १४ मार्चपासून व्यावसायिक वापरासाठी एक लाख ६ हजार टन गॅसचा पुरवठा झाल्याची माहिती त्यांनी दिली. ५ किलोग्रॅम वजनाचे एक लाखापेक्षा जास्त सिलेंडर्स दररोज विकले जात आहेत असं त्या म्हणाल्या.

पश्चिम आशियातल्या घडामोडींवर सरकारचं बारकाईने लक्ष असून ऊर्जा पुरवठ्याच्या दृष्टीनं विविध मंत्री आखाती देशांचे दौरे करत आहेत असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. लेबनॉनमधल्या हिंसाचार चिंतेचा विषय असून तिथल्या भारतीय समुदायाशी भारतीय दूतावासाचा सतत संपर्क आहे.  आपल्या नागरिकांची सुरक्षितता याला सर्वोच्च प्राधान्य असून आंतरराष्ट्रीय कायद्यांचं पालनही आवश्यक आहे, असं ते म्हणाले.

आखातातले सर्व भारतीय नाविक कर्मचारी सुरक्षित असून गेल्या २४ तासात भारताच्या कोणत्याही जहाजाबाबत अनुचित प्रकार झाल्याचं वृत्त नाही, असं बंदर नौवहन आणि जलमार्ग विभागाचे सचिव मुकेश मंगल यांनी सांगितलं.

<><><><><>

१९वा मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव- मिफ येत्या १५ ते २१ जून दरम्यान मुंबईच्या एनएफडीसी संकुलात होणार आहे. माहितीपट, लघुपट आणि ॲनिमशन अशा ३ प्रकारचे चित्रपट जगभरातून या महोत्सवात सादर होतात. सहभाग नोंदवण्याासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत येत्या रविवारपर्यंत म्हणजेच १२ एप्रिलपर्यंत आहे. अधिक माहिती https://filmfreeway.com/MumbaiInternationalFilmFestival-MIFF या मंचावर उपलब्ध आहे.

<><><><><>

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुमारे ३० किलो सोन्याच्या तस्करीचा प्रयत्न महसूल गुप्तचर संचालनालयानं हाणून पाडला. ऑपरेशन धहाबू ब्लिट्स कारवाईत पकडण्यात आलेल्या सोन्याचं मूल्य ३७ कोटी ७४ लाख रुपये इतकं आहे. याप्रकरणी २४ महिलांना अटक झाली आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ९१८ अंकांची वाढ झाली आणि तो ७७ हजार ५५० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २७५ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ५१ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

विधिमंडळातील युवा सदस्यांनी आपल्या मतदारसंघाच्या विकासाबरोबरच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासन अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असं आवाहन विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले. पणजी येथे आयोजित केलेल्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या परिषदेमध्ये "विकसित भारताचं उद्दीष्ट साध्य करतेवेळी विधिमंडळातील युवा सदस्यांची भूमिका" या विषयावर ते बोलत होते. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली ही दोन दिवसीय परिषद होत आहे.

<><><><><>

नोकरी-व्यवसायानिमित्त मुंबईत येणाऱ्या नागरिकांना परवडणारी भाड्याची घरं उपलब्ध करून देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारून ती कार्यान्वित करावी, त्यासाठी आवश्यक असणारं पोर्टल उभारावं, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबई इथं एका शासकीय बैठकी दरम्यान दिले. भाड्याने देण्यासाठी उपलब्ध असलेल्या घरांबाबत समन्वयाने कार्यवाही केल्यास मालक तसंच भाडेकरू या दोघांनाही अडचण येणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री फडनवीस यांनी यावेळी व्यक्त केला. महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ या कायद्याअंतर्गत या कामी सक्षम प्राधिकारी म्हणून पोलीस उपायुक्त यांना नियुक्त करावं, असंही फडनवीस यांनी यावेळी सुचवलं.

<><><><><>

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आगामी गगनयान मोहिमेसाठी दुसरी एकात्मिक एअर ड्रॉप चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. आंध्र प्रदेशातल्या श्रीहरीकोटा इथं ही चाचणी करण्यात आली. अंतराळवीर ज्या कॅप्सूलमध्ये बसतात, तिला पृथ्वीच्या आवरणात पुन्हा प्रवेश करता यावा आणि सुखरूप उतरता यावं, यादृष्टीनं ही चाचणी महत्त्वपूर्ण मानली जाते.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी या यशस्वी चाचणीबद्दल इसरोचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

मुंबईतील शिधावाटप विभागाच्या यंत्रणेनं अवैध गॅस साठवणूक आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई केली असून मुंबईतल्या डोंगरी परिसरात अवैध गॅस सिलिंडरची वाहतूक करणाऱ्या ८ गाड्यांसह ४५१ सिलेंडर जप्त केले आहेत. हा मुद्देमाल ४० लाख ६१ हजार ७१६ रुपये किमतीचा असल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे. जीवनावश्यक वस्तूंचा अशा प्रकारचा काळाबाजार किंवा अवैध साठवणूक कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही. त्याविरुद्ध कठोर कारवाई मोहीम भविष्यातही अशीच सुरु राहील असा इशारा शिधावाटप विभागानं दिला आहे.

<><><><><>

राज्य विधिमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीने तीन दिवस नंदुरबार जिल्ह्याचा दौरा करत शासनाच्या योजना आदिवासी बांधवांपर्यंत पोहचत आहेत की नाही याचा आढावा घेतला. पहिल्या दिवशी आढाव्यानंतर दोन दिवस दोन पथकांच्या द्वारे या समितीतील

आमदारांनी विविध विकास कामांना भेट दिली . पेसा भरतीतील उमेदवारांना प्राधान्याने भरती करण्याच्या सूचना यावेळी समितीने केल्या .

<><><><><>

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्स आणि रॉयल्स चॅलेंजर्स बेंगळुरु यांच्यात सामना होणार आहे. गुवाहाटी इथं थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

मात्र पावसामुळे नाणेफेक अद्याप झाली नसून सामना लांबण्याची शक्यता आहे.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली.येत्या दोन दिवसात राज्याच्या कोकणात उष्ण आणि दमट हवामा राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. इतरत्र हवामान कोरडं राहिल.

//<><><><><>//